# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय सोलापूर

## (गृह शाखा)

दुरध्वनी क्र. ०२१७- २७३१०२१, email-id-dcbsolapur@gmail.com

---

क्र. २०२०/डिसीबी/२/आरआर/२०१५ दिनांक- २२/०३/२०२०

**(फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये घोषणापत्र)**

ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीयस्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत, असे प्रवासी सोलापूर जिल्ह्यामध्येही परदेश प्रवास करुन आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे कोरोना विषाणूचा संसर्ग जिल्ह्यात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे इत्यादी बाबी टाळणे अत्यावश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यात कोरोना विषाणुमुळे (COVID-१९) उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे जागतिक आरोग्य संघटना व आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव प्रसारित केलेल्या विविध उपाययोजनांची अंमलबजावणी व राज्यात या कोरोना विषाणूमुळे (COVID-१९) उद्भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली असल्याने साथरोग अधिनियम १८९७ च्या खंड २ नुसार राज्याला मिळालेल्या अधिकारानुसार, महाराष्ट्र राज्यात साथरोग अधिनियमातील खंड २, ३, व ४ ची अंमलबजावणी अधिसूचनेच्या दिनांकापासून सुरु केली आहे.

त्याअर्थी, कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पाहता, सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस/ इसमास त्याच्या संपर्कात आलेने होण्याची शक्यता विचारात घेता, मी मिलींद शंभरकर, जिल्हादंडाधिकारी सोलापूर, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७३ चे कलम १४४ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन असा आदेश देतो की, सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, पंढरपूर, अक्कलकोट, सांगोला, मंगळवेढा, करमाळा, कुर्डूवाडी, मैंदर्गी, दुधनी, मोहोळ या नगरपालिका क्षेत्रात व माढा, माळशिरस या नगर पंचायत क्षेत्रात **दिनांक २३.०३.२०२० रोजी सकाळी ०५.०० ते दि. ३१.०३.२०२० रोजी रात्री २४.०० वा. पर्यंत** पांच किंवा पांचाहून जास्त लोक एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, कार्यक्रमांचे आयोजन करणे, इत्यादीस तसेच खालीलप्रमाणे बंदी घालणेत येत आहे.

१. खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे सर्व प्रकारचे कार्यक्रम, समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, सण, उत्सव, उरुस, जत्रा, मनोरंजनाचे कार्यक्रम, क्रीडा व इतर सर्व स्पर्धा इ. यांना मनाई राहील.

२. खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील अशा सर्व प्रकारची कृत्ये जसे कार्यशाळा, कॅम्प, प्रशिक्षण वर्ग, बैठक, मिरवणुक, मेळावे, सभा, आंदोलने, सहली, देशांतर्गत व परदेशी सहली इ. यांचे आयोजन करण्यासाठी मनाई राहील.

३. सोलापूर जिल्ह्यातील असणाऱ्या दुकाने / सेवा आस्थापना, उपहारगृहे/खाद्यगृहे/खानावळ, शॉपींग कॉंप्लेक्स, मॉल्स, सुपर मार्केट, मनोरंजनाची ठिकाणे, क्लब/पब, क्रीडांगणे, मैदाने, जलतरण तलाव, उद्याने, सिनेमागृहे, नाट्यगृहे, शाळा, महाविद्यालये, खाजगी शिकवणी वर्ग, व्यायामशाळा, संग्रहालये, व्हिडीओ पार्लर, ऑनलाईन लॉटरी सेंटर इ. बंद राहतील.

४. सर्व नागरिकांना अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी विहीत कारणाशिवाय येण्यास मनाई राहील.



Scanned with CamScanner

**सदरचे आदेश खालील बाबतीत लागु होणार नाहीत –**

१. शासकीय/ निमशासकीय कार्यालये, सरकारी महामंडळाचे उपक्रम/आस्थापना
२. अत्यावश्यक सेवेतील व्यक्ती, रुग्णालये, पॅथोलॉजी लॅबोरेटरी, दवाखाना
३. सर्व प्रकारचे वैदयकीय महाविदयालय (अॅलोपथी, आयुर्वेदिक, होमिओपथी इ.), नर्सिग कॉलेज
४. रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टॅण्ड, महानगर परिवहन थांबे व स्थानके, विमानतळ व रिक्षा थांबे इ.
५. बँक
६. अंत्यविधी (या ठिकाणी गर्दी होऊ नये याची दक्षता घ्यावी.)
७. अत्यावश्यक किराणा सामान, दुध/दुग्धोत्पादने, फळे व भाजीपाला, औषधालये, जीवनावश्यक वस्तु विक्रीची ठिकाणे
८. सर्व हॉटेल/लॉज यांना तेथे वास्तव्यास असणा-या ग्राहकांना आरोग्यविषयक आवश्यक ती खबरदारी घेवुन रेस्टॉरंटमध्ये खाद्यपदार्थ बनवून देण्यास परवानगी राहील.
९. विदयार्थ्यांसाठी खानावळ तसेच महाविदयालय/ वस्तीगृह यांमधील कॅन्टीन/ मेस (केवळ परिक्षार्थी)
१०. इ.१० वी व इ. १२ वी तसेच राज्य शासन व केंद्र शासनाकडुन घेण्यात येणा-या सर्व स्पर्धा परिक्षा, विद्यापीठ / विश्व विद्यालयाच्या परीक्षा देणारे विद्यार्थी व संबंधित शैक्षणिक व्यक्ती
११. ज्या आस्थापना (उदा. माहिती व तंत्रज्ञान उद्योग) ज्यांच्याकडे देश व परदेशातील अतिमहत्त्वाच्या (Critical National and International Infrastructure) उपक्रमाची जबाबदारी आहे व सदर आस्थापना बंद राहिल्याने अशा उपक्रमाच्या प्रक्रियेला बाधा येऊ शकते असे सर्व संबंधित उपक्रम कार्यान्वित राहू शकतील. (परंतु या दृष्टीने सदर आस्थापना कार्यरत ठेवण्याच्या आवश्यकतेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात विशेषरित्या कळविणे बंधनकारक आहे. संपर्क क्र. ०२१७-२७३१०१२, E-mail :- ddmo.rfsol-mah@gov.in).
१२. प्रसारमाध्यमांचे (सर्व प्रकारचे दैनिक, नियतकालिके, टीव्ही न्युज चॅनेल इ.) कार्यालय चालू राहतील.
१३. मॅन्युफॅक्चरींग अॅण्ड प्रॉडक्शन कंपनी,
१४. मोबाईल कंपनी टॉवर संबंधित काम सुरू राहील.

**टिप :-** १) वरील नमुद सर्व अधिकारी कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी यांनी त्यांचे नेमणूकीचे आदेश, परीक्षेसाटीचे प्रवेशपत्र तसेच ओळखपत्र सोबत बाळगणे बंधनकारक आहे.

२) वरील नमुद ठिकाणी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व प्रसार टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची दक्षता संबंधित कार्यालये, दुकाने/ आस्थापना यांच्या चालक/ मालक, कार्यालयीन प्रमुख तसेच व्यवस्थापक यांनी घ्यावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना **भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८** मधील तरतुदीनुसार दंडनिय/ कायदेशीर कारवाईस पात्र असून अशा व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांचेविरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांनी कारवाई करावी.

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी सोलापूर SOLAPUR

स्थळ :- सोलापूर
दिनांक :- २२/०३/२०२०

(मिलींद शंभरकर)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
सोलापूर

प्रत:- पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचेकडे प्रसिध्दीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत:- उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर क्र. १ / सोलापूर क्र. २ / मंगळवेढा / पंढरपूर / माढा / माळशिरस विभाग अकलूज
प्रत:- व्यवस्थापक,येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. यांचेकडे राजपत्रात प्रसिध्द करणेसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांना सर्व स्थानिक प्रमुख वृत्तपत्रात प्रसिध्द करणे कामी.
प्रत:- तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, उत्तर सोलापूर/ दक्षिण सोलापूर/ बार्शी/ अक्कलकोट/ माढा/ मोहोळ/करमाळा/ पंढरपूर/ सांगोला/ मंगळवेढा/ माळशिरस यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.
प्रत:- मुख्याधिकारी, नगरपालिका, बार्शी/ कुर्डूवाडी/सांगोला/ पंढरपूर/ मंगळवेढा/अक्कलकोट/ मैंदर्गी/दुधनी/ करमाळा माढा/ माळशिरस

E:\E DRIVE\DCB-२\२०१९-२०२०\Corona\१४४ (Repaired).doc

Scanned with CamScanner